**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०२ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ देशांच्या दौऱ्यावर रवाना/ आज घाना इथं उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर करणार चर्चा.
2. शेतकऱ्यांच्या फसवणुकी संदर्भातल्या गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी शेतकरी न्यायालयाचा राज्य सरकारचा प्रस्ताव.
3. राज्यात वीज कोसळून मृत्यू झालेल्या शेतकरी आणि शेतमजुरांच्या कुटुंबांना अर्थसहाय्य वाढवून देण्याबद्दल मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचं आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांचं आश्वासन.
4. नागपूरच्या बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयात आता 'आफ्रिकन सफारी' अनुभवता येणार.

---------------------------------------------

**घाना दौरा-प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज घाना, त्रिनिदाद-टोबॅगो,अर्जेंटिना, ब्राझील, नामिबिया या ५ देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले. ते प्रथम घाना इथं उभयपक्षी हिताच्या अनेक मुद्द्यांवर बैठकांबरोबरच ते तिथल्या संसदेलाही संबोधित करणार आहेत. घानामधल्या भारतीय समुदायात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी उत्साहाचं वातावरण आहे. प्रधानमंत्री उद्या त्रिनिदाद टोबॅगोसाठी रवाना होतील तिथे ते त्रिनिदादच्या राष्ट्रपती क्रिस्टिन कार्ला कांगालू आणि प्रधानमंत्री कमला प्रसाद बिसेसर यांची भेट घेतील. त्यानंतर प्रधानमंत्री अर्जेंटिनाला जाणार असून गेल्या ५७ वर्षांतला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिला अर्जेंटीना दौरा आहे. त्यानंतर प्रधानमंत्री ब्राझील इथं येत्या ६ आणि ७ जुलैला रिओ दी जिनेरो इथं होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील. गेल्या सहा दशकातला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच ब्राझील दौरा आहे. ब्राझीलचे अध्यक्ष लुईस इना सियोलुला दा सिल्वा यांच्याबरोबर ते चर्चा करतील.दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नामिबियाला भेट देणार आहेत. तिथे ते नामिबियाचे अध्यक्ष डॉक्टर नेतुम्बो नंदी नदैतवाह यांची भेट घेतील.

------------------------------------------------

**शेतकरी न्यायालय/वीज अपघात**

राज्यात शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी आर्थिक गुन्हे विभाग, ईओडब्ल्यू आणि ग्राहक न्यायालयाच्या धर्तीवर शेतकरी न्यायालय उभारण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज विधानसभेत दिली. सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात सोयाबीन खरेदीसाठी २ केंद्रं निश्चित केली असून तिथं सुमारे पाच हजार पाचशे कोटी रुपयांची खरेदी झाल्याची माहिती त्यांनी आज विधासभेत दिली. सोयाबीन खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्याची आवश्यकता असल्यास सरकार याबाबत अनुकूल असल्याचं रावल म्हणाले. रोहित पवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. राज्यात वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी किंवा शेतमजुरांच्या कुटुंबियांना दिली जाणारी चार लाख रुपयांची मदत वाढवून ती दहा लाख रुपये करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात केली. याबाबत विचार करून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असं आश्वासन आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलं. अशा दुर्घटना रोखण्यासाठी दामिनी आणि सचेत हे दोन ॲप केंद्र सरकारच्या IITM संस्थेन विकसित केल असून त्या व्यतिरिक्त आणखी एक आधुनिक ॲप विकसित करण्यात येत आहे. अशी माहिती त्यांनी दिली.

------------------------------------------------

**मकोका**

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून या संदर्भातलं विधेयक या अधिवेशनात आणून त्यानुसार कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत केली. आमदार परिणय फुके यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. असे गुन्हेगार एका राज्यात अटक होऊन जामीन मिळाल्यानंतर दुसऱ्या राज्यात जाऊन तिथे गुन्हे करतात, हे टाळण्यासाठी सर्व राज्यांमध्ये माहितीची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.....

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)*

*आपल्या कायद्यामध्ये बदल करून आपण यांना संघटित गुन्हेगारीखाली मकोकाखाली अटक करता येईल. या प्रकारचं अमेंडमेंट याच अधिवेशनात आणतो आहोत या अधिवेशनामध्ये आपण ते अमेंडमेंट करून निश्चितपणे यांना त्याअंतर्गत आपण कारवाई करू. तर या अधिवेशनामध्ये मी टास्क फोर्सची घोषणा केली होती. मला सांगता का समाधान आहे की हा टास्कफोर्स पूर्णपणे कार्यान्वित झालेला आहे. आतापर्यंत आपल्याकडे एनडीपीएसच्या संदर्भातलं यूनिट हे फक्त काही ठिकाणी जिल्हास्तरावर होतो. पण आता प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्रपणे एनडीपीएसचं युनिट आपण तयार केलेला आहे.*

---------------------------------------------

**विधान परिषद**

**राज्यातल्या शाळांमध्ये पटसंख्या कमी असली तरी त्या शाळा बंद केलेल्या नाहीत, आणि यापुढेही होणार नाहीत, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार विक्रम काळे यांच्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते. राज्यातल्या एकंदर एक लाख, आठ हजारापेक्षा जास्त शाळांपैकी १८ हजारापेक्षा जास्त शाळांची पटसंख्या २० पेक्षा कमी आहे, मात्र यापैकी कोणतीही शाळा बंद झालेली नाही, असं त्यांनी सांगितलं. कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये अतिरिक्त असलेल्या शिक्षकांना इतर शाळांमध्ये समयोजित करून नंतरच त्यांना कार्यामुक्त केलं जात असल्याचंही भोयर यांनी नमूद केलं. संख्या वाढूनही शिक्षक नसलेल्या शाळांमध्ये संचमान्यतेच्या नियमानुसार शिक्षकांची नियुक्ती केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.**

---------------------------------------------

**सभात्याग**

**शेतकरी आत्महत्या आणि बैलाच्या जागी स्वतः जोताला जोडण्याचा शेतकऱ्याचा प्रयत्न याविषयावर विरोधी पक्षांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाकारला. या गंभीर स्थितीवर आताच चर्चा करण्याची मागणी विजय वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी केली, ती अध्यक्षांनी नाकारली. सरकारही चर्चेला तयार आहे, आम्हालाही शेतकऱ्यांची काळजी आहे, असं उत्तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर दिलं. मात्र याचा निषेध करत विरोधी सदस्यांनी सभात्याग केला.**

---------------------------------------------

**गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय**

नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयात आता 'आफ्रिकन सफारी' अनुभवता येणार आहे. गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी विकसित करण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत एफडीसीएम (FDCM) गोरेवाडा झू लिमिटेड आणि नॅशनल बिल्डिंग कंन्ट्रक्शन कार्पोरेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील सुमारे 63 हेक्टर जागेवर आफ्रिकन सफारी विकसित करण्यात येणार असून, सुमारे 22 आफ्रिकन प्रजातींचा समावेश या भागात असणार आहे. तसच प्रवेशद्वाराचही काम करण्यात येणार आहे. सुमारे 285 कोटींचा हा प्रकल्प असून ही कामे १८ महिन्यांत पूर्ण करण्याच उद्दिष्ट ठेवण्यात आल आहे. ही आफ्रिकन सफारी पूर्णत्वास गेल्यानंतर नागपूर हे प्राणीसंग्रहालय पर्यटनाच महत्त्वाच केंद्र म्हणून ओळखल जाणार असून, पर्यावरण जागरूकता आणि जैवविविधतेच संवर्धन यास चालना मिळणार आहे.ठिपकेदार तरस, पांढराशिंगी गेंडा, पाटस मंकी, रेड रिव्हर हॉग, आफ्रिकन सिंह, चिंपांझी, हमाड्रायस बबून, चिता या प्राण्यांसह मोकळ्या परिसरात मुक्तपणे वावरणारे प्राणी -शहामृग, पाणगेंडा, इम्पाला हरण, जेम्स बॉक, कॉमन ईलंड (Common Eland), ब्लू विल्डबीस्ट, जिराफ, बर्चेल्स झेब्रा, कुडू हे प्राणी या उद्यानात असणार आहेत.

-----------------------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील गोंदिया यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, वाशीम, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांसह वादळ येण्याची शक्यता आहे. यवतमाळमध्ये अनेक ठिकाणी तर चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, अमरावती, वाशीम, बुलढाणा इथं काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात गेल्या २४ तासात झालेल्या मुसळधार पावसामुळ नद्या-नाले ओसंडून वाहत आहेत. दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा ब्रह्मपुरी-वडसा मार्गावरचा भूती नदीवरचा पूल वाहून गेल्यानं वाहतूक ठप्प झाली आहे.

-----------------------------------------------

दीक्षाभूमी बचाव

दीक्षाभूमी बचाव-विकास  सौंदर्यीकरण समितीच्या वतीन काल दीक्षाभूमी परिसर नागपूर येथे एक दिवसीय धरणे -उपोषण आंदोलन झाले. हे आंदोलन दीक्षाभूमीच्या लगत असलेल्या कॉटन रिसर्च सेंटर ची जमिन हस्तांतरित करून दीक्षाभूमीचा विकास आणि सौंदर्यकरण करण्यात याव या एकमेव मागणीसाठी करण्यात आल. गेल्या वर्षभरापासून समितीन विविध पातळीवर प्रशासनासोबत चर्चा केली पण समाधानकारक उत्तरे नाही मिळाली. संपूर्ण दीक्षाभूमीचाविकास आणि सौंदर्यकरण  त्वरित करावे असा इशारा आंदोलकांनी दिला.

---------------------------------------------

## विशेष मोहीम

राजर्षी छत्रपती शाहु महाराज  यांच्या जयंती निमित्तान जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूरच्या वतीन ४ जुलैपर्यंत विशेष मोहीमेच आयोजन करण्यात आलेल आहे. या कालावधीमध्ये जे विद्यार्थी १२ वी विज्ञान परीक्षा पास झालेले आहेत आणि  त्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घ्यायचा अशा विद्यार्थ्यांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात अर्ज सादर करावे.

---------------------------------------------